जिल्हाधिकारी कार्यालय सातारा
क्र.मह/२/आस्था/४/कावि-२३८/१९
सातारा :- १४/०२/२०१९

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी,**
**सातारा**

**विषय** :- राज्य सेवा पूर्व परिक्षा-२०१९ दि. १७ फेब्रुवारी २०१९ परीक्षेच्या व्यवस्थापनाबाबत विशेष सूचना प्रसिद्ध करणेबाबत.

**संदर्भ** :- मा.उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई यांचेकडील पत्र क्र.एसएसपी-०५१९/सीआर-५७/२०१८/तीन दि.१३/०२/२०१९

मा. उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई यांचेकडील वरील संदर्भीय पत्रान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्य सेवा पूर्व परिक्षा-२०१९ दि. १७ फेब्रुवारी २०१९ रोजी घेणेत येणार आहे. त्यानुसार राज्य सेवा पूर्व परिक्षा-२०१९ चे अनुषंगाने खाली नमूद केलेल्या विशेष सूचनांची सर्व प्रमुख वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्धी द्यावी.

१) आयोगामार्फत आयोजित परीक्षांमध्ये कॉपीचा/गैरप्रकाराचा प्रयत्न करणाऱ्या घटनांची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.
२) अशा प्रकरणी आयोगाकडून संबंधितांवर फौजदारी व प्रशासकीय अशा दोन्ही स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे.
३) परीक्षांकरीता आयोगाने कडक उपाययोजना केलेल्या आहेत.
४) परीक्षा उपकेंद्रावर उमेदवारांची पोलीस कर्मचाऱ्यांकडून तपासणी [Frisking] करण्यात येणार आहे.
५) आयोगाकडून परीक्षेच्या पर्यवेक्षणासाठी विशेष निरीक्षक/भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे.
६) परीक्षेच्या पर्यवेक्षणाकरीता आयोगाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.
७) जिल्हाधिकारी स्वतः पर्यवेक्षणावर लक्ष ठेवणार आहेत.

**केंद्र प्रमुख तथा**
**निवासी उपजिल्हाधिकारी सातारा**

Scanned by CamScanner